**मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे आस्थापनेवर नव्याने सावधी पदे निर्माण करण्याबाबत...**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, मुंबई**

क्रमांक : ६४४१ /क-१

दिनांक : २३ एप्रिल, २०२५

**संदर्भ :-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०२५

**:: ज्ञापन ::**

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे आस्थापनांवर प्रत्येकी १८ सावधी पदे त्यांची सदर पदावर निवड झाल्याच्या दिनांकापासून त्यांच्या पदावधीपर्यंत निर्माण करण्यात आली आहेत.

सदर पदांवर नियुक्ती/ प्रतिनियुक्तीसाठी कोणत्या संवर्गातील शासकीय/ निमशासकीय कार्यालय/ स्वायत्त संस्था/ महामंडळे यातील अधिकारी/ कर्मचारी पात्र असू शकतील, याबाबतचा तपशिल 'परिशिष्ट-अ' मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. तसेच बाहेरील उमेदवारांची नियुक्ती करताना अवलंबवयाची कार्यपद्धती 'परिशिष्ट-ब' मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

या पदांचे वेतन व भत्ते इत्यादीवरील खर्च **'मागणी क्रमांक झेडसी-१' '२०११ संसद/राज्य/ संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, ०२, राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, १०३, विधानमंडळ सचिवालय, ०१-महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (अनिवार्य) (२०११ ००७६), ०१ वेतन'** या लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

सदरहू ज्ञापन वित्त विभाग/व्यय-४ नस्ती क्र.२८३७, दि.२ एप्रिल, २०२५; वित्त विभाग/ सेवा-९ अनौसं ९५/आपुक-२५, दिनांक ९ एप्रिल, २०२५ व वित्त विभाग/आपुक नस्ती क्र.६००८, दि.९ एप्रिल, २०२५ अन्वये विहित केलेल्या अटी व सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२/..

म.वि.स./क-१(आस्थापना)

**प्रति,**

अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

६) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

९) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

१०) सचिव, वित्त विभाग (व्यय-४), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

११) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१२) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१३) संगणक कक्ष

१४) निवड नस्ती

म.वि.स./क-१ (आस्थापना)

या सचिवालयाचे ज्ञापन क्र.६४४१ /क-१, दिनांक २३ एप्रिल, २०२५ सोबतचे

## 'परिशिष्ट-अ'

मा.पीठासीन अधिकारी यांचे आस्थापनेवर सावधी पदे व सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी/ नियुक्ती कोणत्या संवर्गातील शासकीय/ निमशासकीय कार्यालय/ स्वायत्त संस्था/ महामंडळे यातील अधिकारी/ कर्मचारी पात्र असतील याचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | वेतनस्तर | पात्र अधिकारी/ कर्मचारी तपशिल |
|---|---|---|---|---|
| १) | जनसंपर्क अधिकारी तथा राष्ट्रकुल संसदीय मंडळ (CPA) समन्वयक | १ पद | एस-१४: ३८६००-१२२८००<br>एस-१५: ४१८००-१३२३००<br>एस-१८: ४९१००-१५५८००<br>एस-२३: ६७७००-२०८७०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी |
| २) | विशेष कार्य अधिकारी | ५ पदे | एस-१७: ४७६००-१५११००<br>एस-१८: ४९१००-१५५८००<br>एस-१९: ५५१००-१७५१००<br>एस-२०: ५६१००-१७७५००<br>एस-२३: ६७७००-२०८७००<br>एस-२५: ७८८००-२०९२०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील/ राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी/ बाहेरील उमेदवार (किमान वेतनस्तर) |
| ३) | कार्यक्रम अधिकारी | १ पद | एस-१७: ४७६००-१५११००<br>एस-२०: ५६१००-१७७५००<br>एस-२३: ६७७००-२०८७०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी |
| ४) | स्वीय सहायक | १ पद | एस-१३: ३५४००-११२४००<br>एस-१४: ३८६००-१२२८००<br>एस-१५: ४१८००-१३२३००<br>एस-१७: ४७६००-१५११००<br>एस-१८: ४९१००-१५५८०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्थेमधील अधिकारी/ समतुल्य वेतनश्रेणीतील अधिकारी/ कर्मचारी/ बाहेरील उमेदवार (किमान वेतनस्तर) |
| ५) | निवासी स्वीय सहायक | २ पदे | एस-१३: ३५४००-११२४००<br>एस-१४: ३८६००-१२२८००<br>एस-१५: ४१८००-१३२३००<br>एस-१७: ४७६००-१५११००<br>एस-१८: ४९१००-१५५८०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील अधिकारी, महामंडळे/ स्वायत्त संस्थेमधील अधिकारी/ समतुल्य वेतनश्रेणीतील अधिकारी/ कर्मचारी/ बाहेरील उमेदवार (किमान वेतनस्तर) |

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | वेतनस्तर | पात्र अधिकारी/ कर्मचारी तपशिल |
|---|---|---|---|---|
| ६) | उच्चश्रेणी लघुलेखक | २ पदे | एस-१४: ३८६००-१२२८००<br>एस-१५: ४१८००-१३२३००<br>एस-१६: ४४९००-१४२४००<br>एस-२३: ६७७००-२०८७००<br>एस-२४: ७११००-२११९०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक, निवडश्रेणी, उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी) |
| ७) | लिपिक-टंकलेखक | २ पदे | एस-६: १९९००-६३२००<br>एस-१४: ३८६००-१२२८०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील लिपिक-टंकलेखक |
| ८) | वाहनचालक | १ पद | एस-६: १९९००-६३२०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय सेवेतील वाहनचालक/ बाहेरील उमेदवार (किमान वेतनस्तर) |
| ९) | शिपाई | ३ पदे | एस-१: १५०००-४७६००<br>एस-३: १६६००-५२४००<br>एस-६: १९९००-६३२०० | मा.पीठासीन अधिकारी यांचे शिफारशीने विधानमंडळ सचिवालयातील / राज्य शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील गट-ड संवर्गाचे कर्मचारी/ बाहेरील उमेदवार (किमान वेतनस्तर) |

म.वि.स./क्र-१(आस्थापना)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

या सचिवालयाचे ज्ञापन क्र.६४४१ /क-१, दिनांक २३ एप्रिल, २०२५ सोबतचे

## 'परिशिष्ट-ब'

## मा.पीठासीन अधिकारी यांचे आस्थापनेवर सावधी पदे व सदर पदावर बाहेरील उमेदवारांची नियुक्ती करताना अवलंबवयाची कार्यपद्धती

मा.पीठासीन अधिकारी यांचे आस्थापनेवरील मंजूर विशेष कार्य अधिकारी पदापैकी २ पदे, स्वीय सहायक व निवासी स्वीय सहायकांच्या एकूण मंजूर पदांपैकी २ पदे, शिपाई पदांपैकी १ पद व वाहनचालक बाहेरील उमेदवार म्हणून नेमण्याची मुभा देण्यात येत आहे. विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व निवासी स्वीय सहायक पदावर नियुक्तीसाठी सुचविलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कमीत कमी पदवीधारक व त्यांची वयोमर्यादा १९ वर्षांपेक्षा कमी व ५८ वर्षांपेक्षा जास्त असता कामा नये.

वाहनचालक व शिपाई पदावरील बाहेरील उमेदवार नेमताना शैक्षणिक अर्हता किमान दहावी इयत्ता उत्तीर्ण असावी व त्यांची वयोमर्यादा १९ वर्षांपेक्षा कमी व ५८ वर्षांपेक्षा जास्त असता कामा नये.

सर्व बाहेरील उमेदवारांची नियुक्ती मा.पीठासीन अधिकारी यांच्या पदावधीपुरतीच मर्यादित व कंत्राटी पद्धतीची राहील. त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण न दाखविता कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.पीठासीन अधिकारी यांना राहील. तसेच बाहेरील उमेदवारांना सचिवालयीन सेवेत सामावून घेण्याचा हक्क राहणार नाही.

बाहेरील उमेदवारांमधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक, निवासी स्वीय सहायक, वाहनचालक व शिपाई यांचे वेतन 'परिशिष्ट-अ' मध्ये दर्शविलेल्या वेतनस्तारातील किमान वेतनस्तरात (अधिकच्या मिळणाऱ्या भत्त्यांसह) परिगणित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय